**MHKO110017282025**

<u>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६१/२०२५.**</u>

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव यांचे न्यायालयात

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | - | २०/०३/२०२५. |
| २. | फिर्याद दाखल झाल्याची तारीख | - | २०/०३/२०२५. |
| ३. | फियादीचे नाव व पत्ता | - | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>कामगार अधिकारी, कोल्हापूर |
| ४. | आरोपीचे नाव व पत्ता | - | मिहीर मनोज पाटील.<br>व.व.- २७, धंदा - सीईओ,<br>रा. मल्याग, सिव्हील लाईन्स,<br>होटगी रोड, सोलापूर |
| ५. | आरोपीत गुन्हा | - | किमान वेतन अधिनियम, १९४८<br>कलम २२(अ) प्रमाणे |

दिनांक २०/०३/२०२५ रोजी तुमच्या मालकीच्या मे. लक्ष्मी ऑईल इंजीन्स प्रा.लि., शिरोली एम.आय.डी.सी., कोल्हापूर ही कंपनी चालवत असताना कलम १९(४), १८(३), २५ सह नियम २८, २७(२), ३० च्या तरतुदींचे उल्लंघन करताना मिळून आल्याने तुम्ही किमान वेतन अधिनियम, १९४८ चे कलम २२(अ) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला आहे असा तुमच्यावर आरोप आहे.

६. आरोपीचा जबाब -

| | | |
|---|---|---|
| प्रश्न क्र.१ | - | तुम्हाला फिर्यादची प्रत मिळाली का ? |
| उत्तर | - | होय. |
| प्रश्न क्र.२ | - | तुम्हाला आरोप वाचून दाखविण्यात आले ते समजले का ? |
| उत्तर | - | होय. |
| प्रश्न क्र.३ | - | तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ? |
| उत्तर | - | मला गुन्हा कबूल आहे. |

**आरोपीची सही**

समक्ष,

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 11:15:08 +0530

**( जे. एन. भस्मे. )**

**दिनांक - १४/०३/२०२६.**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव**

आरोपीने स्वतः अर्ज देवून किमान वेतन अधिनियम, १९४८ चे कलम २२(अ) प्रमाणे गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. सरकारी वकिलांचे तसेच आरोपीचे म्हणणे ऐकले. सदरचा गुन्हा हा आरोपीचे हातून पहिल्यांदाच घडलेला असून त्याने कमीत कमी शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे. गुन्ह्याचे स्वरुप तसेच आरोपीचे कबुलीचे कथन यांचा विचार करता आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश.**

१. आरोपी मिहीर मनोज पाटील यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये किमान वेतन अधिनियम, १९४८ चे कलम २२(अ) अंतर्गत दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीने किमान वेतन अधिनियम, १९४८ चे कलम २२(अ) गुन्हयासाठी रक्कम रु. ५००/- (रुपये पाचशे मात्र) द्रव्यदंड भरावा. दंड न भरलेस आरोपीला २(दोन) दिवसांची साधी कैद सुनावण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.03.16 11:15:12 +0530

**पेठ वडगांव** **(जे. एन. भस्मे. )**

**दि. १४/०३/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ वडगांव**